# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## सहायक पूर्व परीक्षा -२०१५
## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे **दिनांक ५ जुलै, २०१५** रोजी घेण्यात आलेल्या **सहायक पूर्व परीक्षा- २०१५** चा निकाल **दिनांक ३ ऑक्टोबर, २०१५** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात पूर्व परीक्षेच्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. या तपासणीनुसार अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी. पुर्वनियोजित कार्यक्रमानुसार मुख्य परीक्षा दिनांक १८ ऑक्टोबर, २०१५ रोजी निश्चित करण्यात आली होती. तथापि, प्रशासकीय कारणास्तव सदर पदाची परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून, विषयांकित परीक्षा दिनांक ८ नोव्हेंबर, २०१५ रोजी फक्त मुंबई केंद्रावर घेण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी. तद्अनुषंगाने अधिसूचना लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.**

**३. सहायक पूर्व परीक्षा- २०१५ ही परीक्षा ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवून घेण्यात आली आहे. मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.**

**विजया पडते**
**उपसचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**

**दिनांक - ३ ऑक्टोबर, २०१५.**